सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई येथील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतत वाढ करण्याबाबत ...

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक. एमईडी २०१८/प्र.क्र.१५६/१८/शिक्षण-२,
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- १७/०४/२०१८

संदर्भ : आरोग्य व कुटूंब कल्याण, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. यु १२०१२/२१/२०१८-एमई-१, (FTS-३१४५८७) दिनांक २०.११.२०१७

**प्रस्तावना:-** आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई येथील एम. डी. (मेडीसीन) आणि एम. डी. ( पेडीयाट्रीक्स) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता अनुक्रमे १६ वरुन २३ आणि १६ वरुन २४ अशी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सदर संस्थामधील संबंधित विषयातील वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेनुसार विद्यार्थी प्रवेशित करण्याच्या अनुषंगाने शासननिर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये दिलेली परवानगी विचारात घेऊन सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय व के.ई.एम. रुग्णालय, परळ, मुंबई येथे अनुक्रमे एम.डी. (मेडीसीन) आणि एम.डी.( पेडीयाट्रीक्स) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता अनुक्रमे १६ वरुन २३ आणि १६ वरुन २४ अशी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वाढ करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**अटी व शर्ती:-**

१. उक्त वैद्यकीय महाविद्यालयामधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार राहिल.
२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.
३. शासकीय नियम/कायदा, मा. सर्वोच्च न्यायालय/ मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

True Copy
[signature] Supe
DEAN
Seth G. S. Medical College
Parel, Mumbai - 400 012.



Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)

४. केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वेळोवेळी अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करु नये.

६. केंद्र शासनाने दिलेली परवानगी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित झालेले विद्यार्थी त्यांच्या संबंधित अभ्यासक्रमाच्या पहिल्या अंतिम परिक्षेकरीता प्रविष्ठ होतील त्या कालावधीपर्यंत देण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनी त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षांकरीता विद्यार्थी प्रवेशीत करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहिल.

७. केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्रांमध्ये विहीत केलेल्या अटींची महाविद्यालय प्रशासनामार्फत तातडीने पूर्तता करण्यात यावी.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११०००११.
सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
अधिष्ठाता, सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई.
निबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२).

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/) 

सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ
करण्यास परवानगी देण्याबाबत

परेल, मुंबई - ४०० ०१२.
10 SEP
समय : ११, १२, १, २, ३, ४, ५
आवक क्र : GPG 2137

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
क्र.एमईडी १०१८/प्र.क्र.२३२/१८/शिक्षण-२
शिबीर कार्यालय, बॅरेक क्र.३, हैद्राबाद हाऊस, सिव्हील लाईन्स, नागपूर
दिनांक:-१०/०७/२०१८

**वाचा**:-१)केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.यू.१२०१२/११/२०१८-एमई-१, दिनांक ३१/०५/२०१८

**प्रस्तावना**:-

सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई या संस्थेस डी.एम.निओनॅटोलॉजी (DM Neonatology) या विषयाच्या अतिविशेषोपचार अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करण्यास संदर्भ क्र.१ अन्वये आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ०१ वरुन ०४ एवढी वाढ करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे डॉ सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई या संस्थेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून डी.एम.निओनॅटोलॉजी (DM Neonatology) या विषयाच्या अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ०१ वरुन ०४ इतकी वाढ करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१. सदर वैद्यकीय महाविद्यालयातील डी.एम.निओनॅटोलॉजी (DM Neonatology) या विषयाच्या अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ०४ (चार) एवढीच राहिल.
२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.
३. शासकीय नियम/कायदा तसेच, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल. त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४. केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.
५. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.
६. केंद्र शासनाने दिलेली परवानगी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून असल्याने संस्थेने विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

AOG
CPG

Dean
Seth G. S. Medical College

प्रशासकीय अधिकारी

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)

७. केंद्रशासनाच्या संदर्भाधीन क्र.१ वरील पत्रात नमूद अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून प्रस्तुत मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भित केंद्र शासनाच्या दिनांक ३१/०५/२०१८ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुरेन्द्र चानकर)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा. सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११०००११.
मा.सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, पॉकेट-१४, सेक्टर-८, द्वारका फेस-१, नवी दिल्ली-११००७७
मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
निबंधक, महाराष्ट्र वैद्यक परिषद, १८९ ए, आनंद कॉम्पलेक्स, दुसरा मजला, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-४०० ०११
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य/अधिष्ठाता, सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-२)

[Print to PDF](http://www.novapdf.com/) without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)